सकाळ



निडसोशी : एसजेपीएन ट्रस्टतर्फे आयोजित सायबर सुरक्षा जागृती कार्यक्रमात सहभागी प्राध्यापक व विद्यार्थी.

# निडसोशी पदवी महाविद्यालयात सायबर सुरक्षा जागृती

संकेश्वर, ता. ११ : निडसोशी येथील एसजेपीएन ट्रस्ट पदवी महाविद्यालयात सायबर सुरक्षा जागृती कार्यक्रम झाला. प्रमुख पाहुणे म्हणून संकेश्वर पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक राजू घस्ती, हवालदार एस. आर. बेवीनकट्टी, प्राचार्य बी. एम. हालभांवी उपस्थित होते. क्लिक हिल फाउंडेशन व सायबर वॉरियर विद्यार्थ्यांतर्फे हा कार्यक्रम झाला. सायबर सुरक्षा, डिजिटल व ऑनलाईन फसवणुकीबाबत सामान्य जनतेला जागरूक करण्यात आले. महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले. या कार्यक्रमाचे संयोजन प्रा. आनंद सोनार यांनी केले. उपक्रमाला पालकांकडून प्रतिसाद मिळाला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. पवन हिरेमठ, प्रा. शिल्पा पाटील यांनी परिश्रम घेतले. संपदा शेंडे हिने सूत्रसंचालन केले.

Belgaum, Belgaum-Today
12/09/2025 Page No. 4